आ. संजय रायमुलकर आज दाखल करणार उमेदवारी अर्ज >> पान 2

अखेर सिद्धार्थ खरात यांना शिवसेनेची उमदेवारी जाहीर >> पान 3

अखेर काँग्रेसच्या जयश्री शेळके यांच्या हातावर शिवबंधन >> पान 4


**सुविचार**

कमजोर कधीही क्षमा करु शकत नाही. क्षमा करणे हा बलवानाचा गुणधर्म आहे. – महात्मा गांधी


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 78 ■ गुरुवार, दि. 24 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




एकाच चित्रपटात सनी देओल आणि बॉबी देओल, बॉक्स ऑफिसवर घालणार धुमाकूळ!

आतील पान

## उबाठाची पहिली यादी जाहीर; ६५ जागांवर उमेदवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी प्रमुख लढत होत आहे. विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवार दि. २२ ऑक्टोबर पासून नामांकन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया ही सुरु झाली आहे. अशा अनेक ठिकाणच्या जागा बाबत अद्याप निर्णय झालेला नाही, मात्र ज्या जागेवर कोणतीही अडचण नाही अशा जागा प्रमुख पक्षाकडून जाहीर केल्या जात आहेत. दि. २३ ऑक्टोबर रोजी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने महाराष्ट्रातील ६५ जागेसाठी उमेदवारांची घोषणा करून त्यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलेल्या पहिल्या यादीत चाळीसगाव विधानसभा मतदारसंघासाठी उमेश पाटील, पाचोरा वैशाली सूर्यवंशी, मेहकर सिद्धार्थ खरात, बाळापुर नितीन देशमुख, अकोला पूर्व गोपाल दातकर, वाशिम डॉ. सिद्धार्थ देवळे, बडनेरा सुनील खराटे, रामटेक विशाल बरबटे, वनी संजय देरकर, लोहा एकनाथ पवार, कळमनुरी डॉ.संतोष टारफे, परभणी डॉ.राहुल पाटील, गंगाखेड विशाल कदम, सिल्लोड सुरेश बनकर, कन्नड उदयसिंग राजपूत, छत्रपती संभाजीनगर मध्य किशनचंद तनवाणी, छत्रपती संभाजीनगर पश्र्चिम राजू शिंदे, वैजापूर दिनेश परदेशी, नांदगाव गणेश धात्रक, मालेगाव बाह्य अद्वय हिरे, निफाड अनिल कदम, नाशिक मध्य वसंत गीते, नाशिक पश्र्चिम सुधाकर बडगुजर, पालघर जयेंद्र दुबळा, बोईसर डॉ.विश्र्वास वळवी, भिवंडी ग्रामीण महादेव घाटळ, अंबरनाथ राजेश वानखेडे, डोंबिवली दिनेश म्हात्रे, कल्याण ग्रामीण सुभाष भोईर, ओवळा माजीवडा नरेश मणेरा, कोपरी पाचपाखाडी केदार दिघे, ठाणे राजन विचारे, एरोली एम. के. मडवी, मागाठाणे उदेश पाटेकर, विक्रोळी सुनील राऊत, भांडुप पश्र्चिम रमेश कोरगावकर, जोगेश्र्वरी पूर्व अनंत (बाळा) नर, दिंडोशी सुनील प्रभू, गोरेगाव समीर देसाई, अंधेरी पूर्व ऋतुजा लटके, चेंबूर प्रकाश फातर्फेकर, कुर्ला प्रविणा मोरजकर, कलीना संजय पोतनीस, वांद्रे पूर्व वरून सरदेसाई, माहीम महेश सावंत, वरळी आदित्य ठाकरे, कर्जत नितीन सावंत, उरण मनोहर भोईर, महाड स्नेहल जगताप, नेवासा शंकरराव गडाख, गेवराई बदामराव पंडित, धाराशिव कैलास पाटील, परांडा राहुल ज्ञानेश्र्वर पाटील, बार्शी दिलीप सोपल, सोलापूर दक्षिण अमर रविकांत पाटील, सांगोले दीपक आबा साळुंखे, पाटण हर्षद कदम, दापोली संजय कदम, गुहागर भास्कर जाधव, रत्नागिरी सुरेंद्रनाथ (बाळ) माने, राजापूर राजन साळवी, कुडाळ वैभव नाईक, सावंतवाडी राजन तेली, राधानगरी के. पी. पाटील व शाहूवाडी सत्यजित आबा पाटील आदींची उमेदवारी जाहीर करून पहिली यादी प्रसिद्ध केली आहे.

## महाराष्ट्र विधानसभेकरिता २८८ मतदारसंघासाठी राज्यातून ५७ उमेदवारांचे ५८ नामनिर्देशन पत्र दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता प्रशासनाची तयारी सुरू आहे. विधानसभेच्या २८८ मतदारसंघाच्या या निवडणुकीकरिता नामनिर्देशन पत्र भरण्याचा आज पहिला दिवस होता. पहिल्या दिवशी म्हणजे २२ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्यातून ५७ उमेदवारांचे ५८ नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता १५ ऑक्टोबर २०२४ पासून लागू झाली असून आज २२ ऑक्टोबर २०२४ रोजी निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. आजपासून नामनिर्देशन पत्र भरण्यास सुरुवात झाली असून २९ ऑक्टबरला नामनिर्देशन पत्र भरण्याची शेवटची तारीख आहे. या अर्जाची ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येऊन ४ नोव्हेंबर २०२४ रोजी अर्ज मागे घेता येईल. मतदान २० नोव्हेंबर रोजी होत असून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

## ऐन निवडणुकीत उद्धव ठाकरेंना मोठा धक्का; पोहरादेवीचे महंत सुनील महाराजांचा राजीनामा

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभेची निवडणूक जाहीर झाली आहे. मंगळवारपासून (२२ ऑक्टोबर) उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवातही झाली आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात घडामोडींना वेग आला आहे. यातच अनेक नेते एका पक्षामधून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही पाहायला मिळत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांचे नेते जोरदार कामाला लागले आहेत. या विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी मुख्य लढत होणार आहे. निवडणुकीसाठी उमेदवारांना एबी फॉर्मही दिले जात आहेत. महाविकास आघाडीच्या उमेदवारांची यादीही लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

अशातच ऐन निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. पोहरादेवीचे महंत सुनील महाराज यांनी शिवसेना ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिली आहे. महंत सुनील महाराज यांनी ठाकरे गटाचा राजीनामा देताना आपली खंतही बोलून दाखवली. गेल्या १० महिन्यांत १० मिनिटेही उद्धव ठाकरेंचा वेळ मिळाला नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे वेळ देत नसल्यामुळे मी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला असल्याचं सुनील महाराज यांनी सांगितलं.

''मी अनेकवेळा उद्धव ठाकरे यांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला, मेसेजही केले. पक्ष वाढीसाठी आणि समाजाच्या हितासाठी मला तुम्हाला भेटायचे आहे. उद्धव ठाकरे यांचे पीए रवी म्हात्रे यांनाही अनेकवेळा संपर्क केला. त्यांच्याकडे उद्धव ठाकरे यांच्या भेटीची वेळ मागितली. मात्र, गेल्या जवळपास १० ते १२ महिन्यांपासून मला त्यांच्या भेटीचा साधा १० मिनिटेही वेळ मिळाला नाही. मग आपण भेटीची वेळ मागून जर भेट मिळत नसेल, आपली दखल घेतली जात नसेल पक्षाला आपली गरज नाही हे यामधून सिद्ध होतं'', असं सुनील महाराज यांनी म्हटलं आहे.

## निवडणुकीच्या काळात सर्व तपास यंत्रणा ॲक्शन मोडवर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणूकीच्याच्या पार्श्वभूमीवर,मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित सर्व तपास व अंमलबजावणी यंत्रणांनी अधिक चोखपणे जबाबदारी पार पडावी.पैशांची देवाणघेवाण,मादक द्रव्य,मद्य विक्री व तस्करी,सोने–चांदींची विक्री आणि तस्करी तसेच हवाला आदी संशयास्पद प्रकरणात कारवाई करण्यात कोणतीही हयगय करू नये.संशयास्पद प्रकरणी थेट व तत्काळ जप्तीची कारवाई करावी. तसेच आर्थिक खर्चाच्या बाबतीत संवेदनशील असलेल्या मतदारसंघांवर अधिक लक्ष केंद्रीत करुन तेथेही योग्य ती कारवाई करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

आयकर विभाग,राज्य उत्पादन शुल्क,सक्तवसूली व अंमलबजावणी,महसूल गुप्तवार्ता,केंद्रीय वस्तू व सेवा कर,राज्य वस्तू व सेवा कर,वस्तू व सेवा कर गुप्तवार्ता, सीमा शुल्क,राज्यस्तरीय बँकर्स समिती,अंमली पदार्थ नियंत्रण,वित्तीय गुप्तवार्ता विभाग;रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,तटरक्षक दल,रेल्वे सुरक्षा दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल,भारतीय विमानतळ प्राधिकरण,नागरी उड्डाण सुरक्षा, परिवहन विभाग,आचारसंहिता कक्ष,मुंबई पोलिस दलाचे कायदा व सुव्यवस्था विभाग यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारीही या बैठकीला उपस्थित होते.

सर्व यंत्रणांकडून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेले नियोजन तसेच सुरू असलेल्या कार्यवाहींचा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी आढावा घेतला. त्यानंतर सर्व यंत्रणांच्या प्रतिनिधींना संबोधित करताना ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीत मध्ये आलेल्या काही अनुभवांच्या आधारे, केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग मुंबईतील निवडणुकीशी संबंधित बारीकसारिक बाबींवर विशेष लक्ष ठेवून आहे. त्यामुळे, मुंबईत कार्यरत असलेल्या प्रत्येक यंत्रणांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक दरम्यान अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. सर्व यंत्रणांचे आपापसांमध्ये योग्य समन्वय राहावे, यासाठी प्रत्येक यंत्रणेने समन्वयक अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. पैशांची देवाणघेवाण, मादक द्रव्य, मद्य विक्री व तस्करी, सोने–चांदींची विक्री आणि तस्करी तसेच हवालांशी संबंधित घडामोडींवर अधिक बारकाईने आणि गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक यंत्रणेने अधिक सक्रिय होऊन अशा संशयास्पद प्रकरणांत कारवाई करण्यात कोणतीही कसूर ठेवू नये. प्रसंगी जप्तीची कारवाई करावी, असे निर्देशही गगराणी यांनी दिले.

ते पुढे म्हणाले कि , संबंधित यंत्रणांनी संयुक्त पथकांची निर्मिती करून त्यांची मुंबईतील 'चेक पोस्ट'वर नियुक्ती करावी. समन्वयक अधिकारयांनी त्यांच्याकडील माहितीची नियमितपणे देवाणघेवाण करावी, जेणेकरुन समन्वयाने कारवाई करता येईल. मुंबईच्या सीमेवर, बंदरांवर, समुद्र किनारयांवर, विमानतळ तसेच वाहतुकीच्या अन्य संसाधनाद्वारे केल्या जाणारया हालचालींवर बारीक लक्ष ठेवून संशयास्पद प्रकरणांमध्ये तात्काळ कारवाई करावी. मद्य विक्री करणारया दुकानांबाबत दक्ष राहावे तसेच त्याठिकाणी काही गैरव्यवहार आढळून आल्यास त्यावर तात्काळ कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

दरम्यान, आर्थिक खर्चाच्या बाबतीत काही मतदारसंघ अत्यंत संवेदनशील आहेत. त्याठिकाणी निवडणुकीच्या काळात पैशांचा व्यवहार होणार नाही तसेच अशा संवेदनशील मतदारसंघांमध्ये होणारी पैशांची देवाणघेवाण, व्यवहार किंवा अन्य कोणत्याही संशयास्पद वित्तीय बाबींवर अधिक बारकाईने लक्ष ठेवून संबंधित यंत्रणांनी तात्काळ कारवाई करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

## एकनाथ शिंदेंचा पुन्हा गुवाहाटी दौरा!

### निवडणूक अर्ज दाखल करण्यापूर्वी सहकुटूंब घेतलं कामाख्य देवींचं दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उद्या २४ ऑक्टोबर रोजी निवडणूक अर्ज दाखल करणार आहेत. त्यापूर्वी त्यांनी आज गुवाहाटी जाऊन सहकुटूंब कामाख्या देवींचं दर्शन घेतलं आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांचा हा तिसरा गुवाहाटी दौरा आहे. या दौऱ्यानंतर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चांनीही उधाण आलं आहे.

एकनाथ शिंदे अडीच वर्षांपूर्वी शिवसेनेतून बंडखोरी करत वेगळी चूल मांडली होती. त्यावेळी सर्व आमदारांना घेऊन ते गुहावाटीला गेले होते. त्यानंतर भाजपाच्या मदतीने त्यांनी राज्यात सत्ता स्थापन केली आणि मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यावेळी कामाख्या देवीच्या आशीर्वादाने आम्ही सत्तास्थापन करत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं होतं. महत्त्वाचे म्हणजे मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी सर्व आमदारांसह पुन्हा गुवाहाटी जात कामाख्या देवीचं दर्शन घेतलं होतं. त्यानंतर आता निवडणूक अर्ज भरण्यापूर्वी त्यांनी पुन्हा एकदा गुवाहाटी जात कामाख्या देवींचं दर्शन घेतलं आहे. गुवाहाटी पोहोचताच एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना आम्ही कामाख्या देवीचे आशीर्वाद घेण्यासाठी गुवाहाटीला आलो असल्याचे त्यांनी सांगितलं. तसेच उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून दुसरी यादीही लवकरच जाहीर होईल, अशी माहिती त्यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी विधानसभा निवडणुकीत विजयाचा विश्वासही व्यक्त केला. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुती विजय निश्चित आहे, असे ते म्हणाले.

दरम्यान, शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटाने काल ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मया यादीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह मंत्री तसेच बऱ्याच विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा उमेदवारी दिली. शिंदे गटाने मंत्री उदय सामंत यांना रत्नागिरीतून, तर त्यांचे बंधू किरण सामंत यांना राजापूरमधून विधानसभेचं तिकीट दिलं. याशिवाय अभिजित अडसूळ यांना अमरावती जिल्ह्यातील दर्यापूरमधून, तर यामिनी जाधव यांना भायखळा आणि मनीषा वायकर यांना जोगेश्वरी पूर्वेतून उमेदवारी दिली.

## विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शंकरराव गडाखांच्या साखर कारखान्याला आयकर खात्याची नोटीस, १३७ कोटी भरण्याचे आदेश

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** राज्यात सर्वत्र निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यातील मुळा सहकारी साखर कारखान्याबाबतएक मोठी बातमी समोर आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शंकरराव गडाखांच्या साखर कारखान्याला आयकर खात्याने नोटीस बजावली आहे. या नोटीसमध्ये कारखान्याला १३७ कोटी रुपये भरण्याचे आदेश देण्यात आले आहे. मात्र ऐन विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर ही नोटीस आल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दबाव टाकण्याचा प्रयत्न– शंकरराव गडाख

अहिल्यानगरच्या सोनई येथील मुळा सहकारी साखर कारखाना हा माजी जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांच्या अधिपत्याखाली येतो. शंकरराव गडाख यांनी नुकताच शिवसेना उध्दव ठाकरे गटात प्रवेश केला होता. त्यामुळे निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गडाख यांच्यावर दबाव टाकण्याचा या प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, केवळ एकाच कारखान्याला नोटीस देण्यात आल्याने अनेक चर्चा सध्या परिसरात रंगू लागल्या आहेत. तर यामागे राजकरण असल्याचा गडाख यांनी आरोप केला आहे.





## शहाजी बापू गुवाहाटीच्या विमानात बसले त्यावेळीच त्यांचा पराभव निरिचत झाला

### सुषमा अंधारे यांची आमदार शहाजी बापू यांच्यावर टीका

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** शहाजी बापू ज्या दिवशी गुवाहाटी जाणाऱ्या विमानात बसले, त्याच दिवशी त्यांचा पराभव निश्र्चित झाला. अशी टीका शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली व सांगोल्याचे मतदार हुशार आहेत ते आता शहाजी बापूंना स्वीकारणार नाहीत. दीपक साळुंखेच्या रूपाने सांगोल्यात आता भगवा फडकेल असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. मुंबई येथे प्रसारमाध्यमांश बोलताना त्यांनी सांगितले की आज पहिली यादी जाहीर झाली आहे, त्याचबरोबर काही पक्षप्रवेश सुद्धा झाले आहेत. उद्याच्या यादीत हडपसरची जागा क्लिअर झालेली असेल. ज्या जागांवर सहमत झाले, त्या जाहीर केल्या असल्याचे सांगून शहाजी बापू यांच्यावर चांगलीच टीका केली. यावेळी त्या म्हणाल्या की, शहाजी बापू मी तुमची लहान बहीण आहे. त्यामुळे फार प्रेमाने एक सल्ला देते माणूस खूप दु:खी झाला की त्याने कोणताही निर्णय घेऊ नये, रागात असेल तर प्रतिक्रिया देऊ नये, तुम्ही अशी प्रतिक्रिया देणे म्हणजे तुम्ही स्वत:चा आत्मघात करुन घेण्यासारखे आहे. बापू ज्या दिवशी तुम्ही गुवाहाटीच्या विमानात बसलात, त्यावेळीच तुमचा पराभव निश्र्चित झाला आहे. तर यावेळी पुन्हा एकदा आम्ही दिपक साळुंखेच्या रुपाने सांगोल्यात भगवा फडकवणार असल्याचा विश्र्वास शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी व्यक्त केला. तर सुषमा अंधारे यांना





विधानसभा लढवणार का असा प्रश्र्न केला असता त्यांनी मी स्वत: पक्षाला सांगितले आहे की एका मतदारसंघात अडकून राहण्यापेक्षा सगळ्यांच्या विजयासाठी प्रचार करणार आहे.महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या विजयासाठी प्रचार सभा घेणार असल्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## जागतिक पोलिओ दिन

आज २४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पोलिओ मुक्तीसाठी मोलाचे योगदान देणारे शास्त्रज्ञ जॉन सॉल्क यांचा आज जन्मदिवस. जॉन सॉल्क आणि त्यांच्या टीमने पोलिओची पहिली लस शोधून काढली म्हणून त्यांचाच जन्मदिन जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय जागतिक आरोग्य संघटनेने घेतला. आजच्या दिवसाकडे पोलिओशी दिलेल्या यशस्वी लढ्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने १९९८ सालापासून पल्स पोलिओची मोहीम हाती घेतली. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यातील रविवार पोलिओ रविवार म्हणून साजरा केला जातो. पोलिओ रविवारच्या नंतरच्या आठवड्यात ० ते ५ वयोगतील बालकांना घरोघरी जाऊन पोलिओचा डोस पाजला जातो. त्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती केली जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आपल्या आरोग्य यंत्रणेने भारतातून पोलिओ मुक्तीसाठी अथक प्रयत्न केले. अमिताभ बच्चन, मोहम्मद कैफ इत्यादी व्यक्तींनीही दूरचित्रवाणीवरून जनजागृती केली. शासन, प्रशासन, आरोग्य यंत्रणा यांच्या अथक प्रयत्नातून आज भारत पोलिओ मुक्त झाला आहे. २७ मार्च २०११ या दिवशी जागतिक आरोग्य संघटनेने भारत पोलिओ मुक्त झाल्याची घोषणा केली. अर्थात सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाला पोलिओ मुक्त करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती. सुरवातीला तर पालक आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्यास तयारच होत नसे. आपल्या बालकांना पोलिओ डोस पाजण्यास पालक निरुत्साही होते. लोक घरातून बाहेरच पडत नसत. पालकांचा निरुत्साह असला तरी आरोग्य खात्यातील कर्मचारी हिरमुसले नाही. त्यांनी त्यांचे काम चालूच ठेवले. एखादे व्रत हाती घेतल्या प्रमाणे देशातील आरोग्य कर्मचारी पोलिओ मुक्तीसाठी झटत होते. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना लवकरच यश मिळाले. १९९९ साली पोलिओच्या तीन विषाणूंपैकी दुसरा विषाणू नष्ट झाला मात्र पहिल्या आणि तिसऱ्या प्रकारचा विषाणू अजूनही कार्यरत होता. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यात दूषित पाण्यामुळे जुलाब,उलट्यांचे प्रमाण अधिक असल्याने तिथे तोंडावाटे दिलेली लस उपयुक्त ठरत नव्हती. तेंव्हा वैद्यकीय संशोधकांनी मुरदाबाद या गावात पोलिओची एक गुणी लस म्हणजे १,२,३ विषाणूंची लस वेगवेगळी प्रत्येक जन्मलेल्या बाळास दिली. मात्र देशातील सगळ्या बालकांपर्यंत असा कार्यक्रम पोहचवणे अशक्य होते. त्यानंतर पुन्हा त्यात संशोधन करण्यात आले. सर्वांना उपयुक्त अशा लसीची मात्रा तयार झाल्यानंतर देशात पोलिओ मुक्तीची मोहीम वेगाने राबवण्यात आली. त्याचा परिणाम म्हणजे आज पोलिओमुक्त मुक्त भारत अशी आपली ओळख बनली आहे. भारत जरी पोलिओमुक्त झाला असला तरी जगातून पोलिओचे अजूनही समूळ उच्चाटन झाले नाही. आफ्रिका खंडातील काही देशात तसेच आशिया खंडातील पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया या देशात अजूनही पोलिओचे रुग्ण आढळून येतात. या देशातूनही पोलिओ लवकरच हद्दपार होईल आणि जग लवकरच पोलिओमुक्त होईल अशी आशा करूया.

# आ. संजय रायमुलकर आज दाखल करणार उमेदवारी अर्ज

## हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर /प्रतिनिधी** : मेहकर विधानसभा मतदारसंघासाठी महायुतीकडून शिवसेनेचे अधिकृत उमेदवार म्हणून आमदार संजय रायमलकर यांना उमेदवारी जाहीर झाली असून ते आज गुरुवार ता. २४ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी मेहकर यांचेकडे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुती मित्र पक्षांचे पदाधिकारी व मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेनेकडून करण्यात आले आहे.

२००९ च्या विधानसभा निवडणुकीत संजय रामुलकर हे शिवसेनेकडून पहिल्यांदा आमदार म्हणून विजय झाले होते. त्यानंतर २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत मेहकर मतदार संघातून दुसऱ्यांदा विजय झाले होते. मनमिळावू स्वभाव ,मतदार संघातील जनतेशी सततचा संपर्क आणि विकास कामे या जोरावर २०१९ ची विधानसभा निवडणूक संजय रायमुलकर यांनी विक्रमी मतांनी जिंकली होती. विदर्भात सर्वाधिक मताधिक्य घेणारे ते एकमेव उमेदवार होते. गेल्या पाच वर्षात मेहकर लोणार तालुक्यात विक्रमी विकास कामे झाली आहेत.

आज ते चौथ्यांदा विधानसभा निवडणुकीसाठी मेहकर मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. केंद्रीय आयुष ,आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापरावजी जाधव यांच्यासह शिवसेना भाजप राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीतील मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित राहणार आहेत. शिवसेना कार्यालय पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटिका ,लोणार वेस, बाजारपेठ गल्ली, मार्गे रॅलीने येऊन आमदार रायमुलकर उमेदवारी अर्ज दाखल करतील .त्यानंतर स्वातंत्र्य मैदान येथे जाहीर सभा होणार आहे.



११ वाजता शिवसेना कार्यालय, मेहकर येथे पदाधिकारी कार्यकर्ते व मतदारांना हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी, उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गाडेकर, तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळूकर , शहर प्रमुख जयचंद भाटिया पांडुरंग सरकटे आदींनी केले आहे.

## उमेदवारीवरून अजितदादांची भुजबळांना तंबी?

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी** : राज्यात विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतरही अजूनही जागा वाटपांच्या चर्चा सुरू आहेत. महायुतीमध्येही जागा वाटपाचा तिढा सुटला नाही. यंदाच्या निवडणुकीत महायुती आणि महाआघाडीत तीन प्रमुख पक्ष असल्याने जागा वाटपाचा तिढा वाढला आहे. दोन्ही आघाड्यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर बंडखोरीचा धोका संभवत आहे. अशातच आता पक्षाच्या नेत्यांकडून बंडखोरांना इशारा दिला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनी थेट भुजबळांना इशारा दिला आहे.

नाशिक जिल्ह्यातील नांदगाव मतदारसंघ महायुतीतील शिंदेच्या शिवसेनेकडे गेला आहे. या मतदारसंघातून विद्यमान आमदार सुहास कांदे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. याच मतदार संघात समीर भुजबळ देखील इच्छुक आहेत. मात्र समीर भुजबळ यांना ही उमेदवारी न मिळाल्याने ते अपक्ष लढण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. नांदगाव मधून मागील निवडणुकीत सुहास कांदे यांनी पंकज भुजबळांचा पराभव केला होता.

आता, समीर भुजबळ नांदगाव मधून निवडणूक लढण्यावर ठाम आहेत. नांदगाव येथे बंड करायचे असेल तर अगोदर पक्षातून राजीनामा द्या अजित पवार यांनी म्हटले असल्याचे म्हटले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समीर भुजबळ यांना अशी तंबी दिल्याची सूत्रांनी माहिती दिली आहे. मात्र तंबी दिल्याच्या वृत्ताला समीर भुजबळ यांनी इन्कार केला आहे.

अजितदादांच्या इशाऱ्यानंतर काय करणार?

उद्या छगन भुजबळ येवला मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. त्यानंतरच समीर भुजबळ नांदगाव बाबत स्पष्ट भूमिका घेणार असल्याची माहिती आहे.

नाशिक जिल्ह्यातील नांदगाव मतदारसंघावरून महायुतीमध्ये हायव्होल्टेज पॉलिटिकल ड्रामा दिसण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्रातील विविध संस्थांना पाच राष्ट्रीय जल पुरस्कार

## पुणे, यवतमाळ आणि बुलढाणातील संस्थांची उल्लेखनीय कामगिरी



नवी दिल्ली, २२: पाण्याच्या महत्त्वाविषयी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे आणि त्यांना सर्वोत्तम पाणी वापर पद्धती अवलंबण्यास प्रवृत्त करण्यासाठी, केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचे आयोजन केले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते ५व्या राष्ट्रीय जल पुरस्कार–२०२३ आज वितरण करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्रातील पुणे, यवतमाळ आणि बुलढाणातील संस्थांना उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार प्रदान करण्यात आले. केंद्रीय जलशक्ति मंत्री सी.आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमात नऊ विविध श्रेणींमध्ये एकूण ३८ पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारांची घोषणा १५ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आली होती.

सर्वोत्कृष्ट राज्याच्या श्रेणीत ओडिशा पहिल्या क्रमांकावर राहिले, तर उत्तर प्रदेश दुसऱ्या आणि गुजरात व पुद्दुचेरीने संयुक्तपणे तिसरे स्थान पटकावले. पुण्यातील भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाउंडेशन (इ–खऋ) डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन या संस्थेला सर्वोत्कृष्ट नागरी संस्थांच्या श्रेणीत पहिले स्थान प्राप्त झाले. यासोबत, पुणे महानगरपालिकेला सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या श्रेणीत तिसरे पारितोषिक देऊन यावेळी गौरवण्यात आले.

यवतमाळ जिल्ह्यातील रेमंड यूको डेनिम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला सर्वोत्कृष्ट उद्योगाच्या श्रेणीत तिसरे पारितोषिक मिळाले. सर्वोत्कृष्ट नागरी संस्थांच्या श्रेणीत, नाशिकच्या युवा मित्रा, मित्रांगन कॅम्पस या संस्थेला द्वितीय पुस्काराने सन्मानित करण्यात आले, तर, सर्वोत्कृष्ट पाणी वापरकर्ता संघटनेच्या श्रेणीत, बुलढाणाच्या पेंटक्ली प्रोजेक्ट युनियन ऑफ वॉटर युजर असोसिएशनला प्रथम पुरस्कारोन सन्मानित करण्यात आले.

पाण्याच्या महत्त्वाविषयी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे आणि त्यांना सर्वोत्तम पाणी वापर पद्धती अवलंबण्यास प्रवृत्त करणे हे राष्ट्रीय जल पुरस्कारांचे उद्दिष्ट आहे. सर्वोत्कृष्ट राज्य, सर्वोत्कृष्ट जिल्हा, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत, सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्था, सर्वोत्कृष्ट शाळा किंवा महाविद्यालय, सर्वोत्कृष्ट उद्योग, सर्वोत्कृष्ट पाणी वापरकर्ता संघ, सर्वोत्कृष्ट संस्था (शाळा किंवा महाविद्यालयाव्यतिरिक्त), आणि बेस्ट सिव्हिल सोसायटी या नऊ श्रेणींमध्ये पाचवे राष्ट्रीय जल पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री श्री. व्ही. सोमण्णा व श्री. राजभूषण चौधरी यांच्यासह राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियान (एनएमसीजी) जलशक्ती मंत्रालयाचे महासंचालक राजीव रंजन मिश्रा, पेयजल आणि स्वच्छता विभागाच्या सचिव विनी महाजन, नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन विभागाच्या सचिव देबश्री मुखर्जी मंचावर उपस्थित होत्या.

**महाराष्ट्रातील जल पुरस्कार प्राप्त संस्थांची थोडक्यात माहिती**

**पुणे महानागरपालिकेला सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्थेच्या श्रेणीत तिसरा पुरस्कार**

पुणे महानगरपालिकेत १००% घरगुती शौचालये आहेत आणि सर्व गटांना सांडपाणी व्यवस्थेशी जोडण्यात आले असून, १००% दर्जेदार पाणी पुरवठ्यासह ७६% पाणी पुरवठा जोडणी देखील येथे आहे. महानगरपालिकेने संपूर्ण शहर परिसरात योग्य साठवण क्षमतेसह छतावरील रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रणाली स्थापित करणे अनिवार्य केले असून, सांडपाणी किंवा सांडपाण्याची एकूण प्रक्रिया क्षमता सुमारे ४७० एमएलडी असलेल्या ९ सांडपाणी प्रक्रिया संयंत्रांची (एसटीपी) स्थापना करण्यात आली आहे. सुमारे ६०% सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात आहे आणि शेती/सिंचन, बांधकामे, बागांची देखभाल, समुदायासाठी जेटिंग मशीन आणि सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता यासारख्या उद्देशांसाठी त्याचा पुनर्वापर केला जात आहे. याव्यतिरिक्त, पाण्याच्या उपलब्धतेबाबत जनजागृती करण्यासाठी 'पाण्यासाठी महिला, महिलांसाठी पाणी अभियान' हा जनजागृती कार्यक्रमही हाती घेण्यात आला आहे. उपचार आणि वितरणाची प्रक्रिया लोकांमध्ये लोकप्रिय झाली असून याव्दारे जलसंवर्धनाच्या उपाययोजनांचा अवलंब करण्यासाठी लोकांवर सकारात्मक परिणाम झाला आहे.

सर्वोत्कृष्ट नागरी संस्थाः प्रथम विजेती–बायफ विकास संशोधन संस्था, पुणे

बी. ए. आय. एफ. डेव्हलपमेंट रिसर्च फाऊंडेशन, पुणे यांनी पाणलोट आधारित संसाधन संवर्धन/व्यवस्थापन, जलसंपदा विकास, झऱ्यांचे पुनरुज्जीवन, पावसाचे पाणी साठवणे आणि जुन्या जलाशयांचे पुनरुज्जीवन यासारखे उपक्रम हाती घेतले आहेत. फाउंडेशनने डायव्हर्जन आधारित सिंचन देखील हाती घेतले आहे आणि जल व्यवस्थापनासाठी स्मार्ट सिंचन पद्धतींना प्रोत्साहन दिले आहे. रेनवॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर्स, टाक्या, पाणी साठवण संरचना यासह सुमारे ३,५४० जलसंधारण संरचना बांधण्यात आल्या आहेत, ज्यामुळे पिण्यासाठी पाण्याची क्षमता निर्माण झाली आहे. ही रचना पीक प्रणाली सुधारणे, माती कार्बन संवर्धन आणि शाश्र्वत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनासह परिसंस्था पुनर्संचयित करण्याव्यतिरिक्त ग्रामीण पाणलोटाची १९.४४ दशलक्ष घनमीटर (चउच्) सिंचन आवश्यकता पूर्ण करतात. याव्यतिरिक्त, फाउंडेशनच्या वॉटरशेड डेव्हलपमेंटला दिलेल्या पाठिंब्यामुळे ११५ गावांचा कायापालट झाला आहे, ज्यात सुमारे ७८०० हेक्टर जमीन समाविष्ट आहे, ज्यामुळे १२ राज्यांमधील १,६९७० कुटुंबांना लाभ मिळाला आहे.

**सर्वोत्कृष्ट नागरी संस्था– युवा मित्रा, मित्रांगन कॅम्पस, नाशिक, महाराष्ट्र**

जलसंपदा विकास आणि व्यवस्थापन, उपजीविका आणि जीवन कौशल्य विकास, आरोग्य, शिक्षण, संस्था बांधणी आणि कृषी विकास यासह विविध उपक्रमांद्वारे उपेक्षित समुदायांना सक्षम करून भारतभर ग्रामीण विकासाला चालना देण्याचा २८ वर्षांचा अनुभव असणारी युवा मित्र ही एक ना–नफा करणारी संस्था आहे. . युवा मित्रा या संस्थेने महाराष्ट्र आणि हरियाणाच्या भूप्रदेशावर एक अमिट छाप सोडली असून इतर १० राज्यांमध्येही पाठिंबा दर्शविला आहे. हाती घेतलेल्या प्रमुख कामांमध्ये १६ ठिकाणी गाळ काढण्याच्या कामांचा समावेश आहे, ज्यामुळे सुमारे ४ लाख घनमीटर साठवण क्षमता निर्माण झाली आहे. युवा मित्राने घेतलेल्या काही कामांमध्ये, प्रामुख्याने २०२३ मध्ये, ७३,००० घनमीटर साठवण क्षमता निर्माण करणाऱ्या ९ स्थळांवरील नाला खोल करण्याचे काम, सुमारे १,१०० हेक्टरवर पसरलेल्या नापीक जमिनीत सिंचन क्षमता आणि ५,००० घनमीटर साठवणूक क्षमता निर्माण करणाऱ्या ३७ गॅबियन्स आणि १५० सैल दगडांच्या संरचनांचे बांधकाम यांचा समावेश आहे. जल पुनर्भरण क्षमता लक्षणीयरीत्या वाढवणे, २०० एकर जमिनीवर सूक्ष्म सिंचन ठिबक प्रणाली विकसित करणे, एकूण १३२०० घनमीटर साठवण क्षमता असलेले ४४ तलाव तयार करणे इत्यादींसाठीही युवा मित्राने काम केले आहे.

**बेस्ट वॉटर युजर असोसिएशनः फर्स्ट विनर–पेंटाकली प्रोजेक्ट युनियन ऑफ वॉटर युजर असोसिएशन, बुलढाणा**

पेंटाकली प्रकल्प संघामध्ये १२ जल वापरकर्ते संघटना (डब्ल्यू. यू. ए.) आहेत आणि शेतकऱ्यांना केलेल्या तरतुदींनुसार पाण्याचा हक्क मिळावा आणि उपलब्ध पाण्यानुसार पीक घ्यावे यासाठी १०,७०० हेक्टर क्षेत्रावर सिंचन व्यवस्थापन प्रकल्प राबविले . या पद्धतीमुळे पिकाची पद्धत बदलली आहे आणि जास्तीत जास्त सिंचन कार्यक्षमता प्राप्त झाली आहे. डब्ल्यू. यू. ए. ने कुक्कुटपालन, दुधाचा व्यवसाय आणि बकरीपालन यासारख्या व्यवसायात शेतकऱ्यांना मदत करण्याव्यतिरिक्त ठिबक सिंचनाद्वारे ३०० हेक्टर क्षेत्र सिंचनासाठी मदत केली आहे, परिणामी त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

**सर्वोत्कृष्ट उद्योगः तिसरा विजेता–रेमंड यूको डेनिम पी. व्ही. टी. लिमिटेड, यवतमाळ**

पर्यावरणीय अधोगतीचा सामना करण्यासाठी, रेमंड यू. सी. ओ. ने ई. टी. पी. गाळ आणि मिठाच्या १००% पुनर्वापरानंतर रसायनांची शून्य जोड सुनिश्र्चित करण्यासाठी सक्रिय गाळ प्रक्रिया (ए. एस. पी.) वापरत आहे. अशा प्रकारे, कंपनीने 'झिरो लिक्विड डिस्चार्ज अँड झिरो सॉलिड स्लज डिस्पोजल' युनिटची स्थिती साध्य केली आहे. या तंत्रज्ञानामुळे आसपासचे उद्योग आणि समुदायांना सुमारे ३,००० के. एल. डी. प्रक्रिया केलेले पाणी उपलब्ध करून देऊन, तेथील पाण्याची समस्या सोडवण्यास मदत झाली आहे. पाण्याचा वापर कमी करण्यासाठी ही कंपनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे, जसे की आर्द्रता प्रकल्पांमध्ये धुके बाष्पीभवन प्रणाली, प्रक्रिया यंत्रांमध्ये स्वयंचलित ऑन–ऑफ व्हॉल्व्ह, साफसफाईच्या यंत्रांसाठी कार्यक्षम स्प्रेगनचा वापर, प्रक्रिया यंत्रांमध्ये सिलेंडर आणि रबर बेल्ट थंड करण्यासाठी अप्रत्यक्ष थंड पाण्याचा पुरवठा, प्रक्रिया आणि बॉयलरमध्ये केंद्रापसारक कंप्रेसरमधून तयार झालेल्या गरम पाण्याचा पुनर्वापर, पाणी निष्फेनीकरण करणारे युनिट आणि इतर फिल्टर युनिट्सच्या ब्लो डाउन पाण्याचा पुनर्वापर सारखे प्रकल्प देखील हाती घेतले असून, यामुळे दरवर्षी सुमारे ९०० घनमीटर पाण्याची बचत होत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# अखेर सिद्धार्थ खरात यांना शिवसेनेची उमेदवारी जाहीर

## मेहकर विधानसभा मतदार संघात मशाल पेटविण्याचा निर्धार

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी** : शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या मेहकर विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून मंत्रालयीन सहसचिव या पदावर अनेक वर्ष सेवा दिलेल्या उच्च विद्याविभूषित सिद्धार्थ खरात यांना उमेदवारी जाहीर करून हा मतदारसंघ आपल्या ताब्यात घेण्याची रणनीती आखली आहे. तर सिद्धार्थ खरात यांच्याही गत अनेक महिन्यापासून सुरू असलेल्या परिश्रमाला यश आले असून त्यांच्यावर महाविकास आघाडीतील उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विश्र्वास टाकून उमेदवारी दिल्याने मेहकर मतदारसंघात शिंदे शिवसेना व उबाठा शिवसेना अशा दोन शिवसैनिकांमध्ये आता विधानसभा निवडणुकीची टक्कर होणार आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. त्याचबरोबर बुलढाणा जिल्ह्यातील राजकीय केंद्रबिंदू सुद्धा आहे. त्यामुळे मेहकर विधानसभा मतदारसंघाला जिल्ह्यातील राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्व आहे. शिवसेनेच्या रूपाने आ. संजय रायमुलकर यांनी तब्बल तीन टर्म अर्थात पंधरा वर्ष भगवा फडकविला आहे. मात्र गत दोन वर्षांपूर्वी घडलेल्या राजकीय घडामोडीने मेहकर मतदार संघातील आ. संजय रायमुलकर हे






एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत गेल्याने हा मतदारसंघ एकनाथ शिंदे यांच्या ताब्यात गेला. मात्र मूळ शिवसेनेचा बालेकिल्ला असलेला मेहकर मतदारसंघ हा शिवसेनेच्याच व शिवसैनिकांच्या हातात राहावा, यासाठी उबाठा शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी कंबर कसली असून विरोधकाच्या हातून हा मतदार संघ घेण्यासाठी रणनिती आखली आहे. तर मंत्रालयीन सहसचिव पद भूषविणारे सिद्धार्थ खरात यांच्या रुपाने विरोधकांना धोबीपछाड देण्यासाठी तगडा उमेदवार रिंगणात उतरविला आहे. सिद्धार्थ खरात यांनी सुद्धा अनेक महिन्यांपासून हा मतदारसंघ उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत.त्यासाठी त्यांनी मेहकर मतदार संघ पिंजून काढला असून शिवसेनेची मशाल घराघरापर्यंत पोहोचविली आहे. त्याचबरोबर मेहकर मतदार संघातील तरुणांना रोजगार मिळावा, यासाठी त्यांनी रोजगार मेळावा घेऊन शेकडो तरुणांच्या हाताला काम सुद्धा दिले आहे. त्याचबरोबर मेहकर मतदार संघातील विकास करून मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी प्लॅन करून कामाची आखणी सुद्धा केली आहे. मतदारसंघातील मतदारांचा सिद्धार्थ खरात यांना उत्स्फूर्त प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे अधिकृत उमेदवारी मिळाल्याने सिद्धार्थ खरात यांनी मेहकर मतदार संघात शिवसेनेची मशाल पेटविण्याचा निर्धार सिद्धार्थ खरात यांनी केला आहे.

सिद्धार्थ खरात यांना बुलढाणा संपर्कप्रमुख नरेंद्र खेडकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवंत, जिल्हा उपप्रमुख आशिष रहाटे यांच्यासह निष्ठावंत शिवसैनिकांची साथ असल्याने या शिवसैनिकांच्या व मायबाप मतदारांच्या बळावर मेहकर मतदारसंघात मशाल पेटवू असा विश्र्वास मेहकर विधानसभा मतदारसंघाचे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केला आहे.

## संक्षिप्त...

### विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक पोलिसांच्या वतीने रूट मार्ट





दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक पोलिसांच्या वतीने आज रूट मार्ट चा आयोजन करण्यात आला होता. नाशिकच्या संवेदनशील परिसरातुन रूट मार्च करण्यात आला आहे गुन्हेगारांचे आणि समाजकंटकांच्या मनात पोलिसांचे विषयी धडकी निर्माण व्हावी तसेच बाहेरून येणारे पोलिसांना संवेदनशील परिसराची माहिती व्हावी या उद्देशाने आज रूट मार्च करण्यात आला या रूट मार्चमध्ये पोलीस उपायुक्त सहाय्यक पोलीस आयुक्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस अधिकारी पोलीस कर्मचारी दंगा नियंत्रण पथक तसेच खास करून निवडणुकीसाठी नाशिक शहरात भारत तिब्बट बॉर्डर पोलिसांचे पथक या पत संचलनामध्ये सहभाग घेतल्या लोकशाहीचा उत्सव शांततेत पार पडावं यासाठी नाशिक पोलीस सज्ज झाली आहे.

### मुंबई-गोवा महामार्गावर ८१ लाखाची विदेशी दारु जप्त; राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने तब्बल ८१ लाखाची विदेशी दारू जप्त केली. ही कारवाई दि. २३ ऑक्टोबर रोजी मुंबई गोवा महामार्गावर केली. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य उत्पादन शुल्क विभाग अक्शनमोडवर आला असून अवैध दारू विक्रीवर बारक लक्ष ठेवून आहे. अशातच गोपनीय माहिती मिळाली की, मुंबई-गोवा महामार्गावर गोवा बनावटीची विदेशी दारू घेऊन आयशर कंपनीचा ट्रक जात आहे. अशा माहितीवरून सदर ट्रकवर कारवाई करून तब्बल ८१ लाख रुपयांची विदेशी दारू, आयशर कंपनीचा ट्रक असा एकूण १ कोटी २ लाख २५ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क मुंबई, राज्य उत्पादन शुल्क संचालक, विभागीय आयुक्त राज्य उत्पादन शुल्क कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनात राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक मुंबई, रत्नागिरी राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक यांच्या पथकाच्या वतीने करण्यात आली. अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभाग उपअधीक्षक हर्षवर्धन शिंदे यांनी दिली आहे.

### सिटी चौक पोलिसांकडून नशेच्या गोळ्यांची विक्री करणाऱ्या आरोपीला अटक



दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : निवडणूक काळात शहरात शांतता ठेवण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यातच अवैध धंदा करणाऱ्यांची आता पोलिसांकडून उचल बांगडी करण्यात येत आहे. गस्त घालत असताना पोलिसांना माहिती मिळाली होती की एक तडीपार आरोपी नशेच्या गोळ्यांची विक्री करत आहेत. मिळालेल्या माहितीवरुन या इसमाला पकडण्यात आले व त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे या गोळ्या आढळून आल्या आहेत. या आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे व त्याच्याकडून २०० गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत.

# खर्च निरीक्षकांकडून नांदेड जिल्ह्यातील आढावा

## एसएसटी, एफएसटी, सी-व्हिजील, एमसीएमसीच्या कामकाजाची पाहणी

दैनिक आपला विदर्भ



**नांदेड/प्रतिनिधी** : नांदेड जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आलेले खर्च निरीक्षक ए. गोविंदराज व मयंक पांडे मंगळवार २२ ऑक्टोबरला दाखल झाले आहेत. त्यांनी २३ रोजी जिल्ह्यातील विविध विभाग प्रमुखांच्या बैठकी घेतल्या तसेच सी-व्हिजील कक्ष, निवडणूक खर्च कक्ष, माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती कक्ष (एमसीएमसी) कक्षाला त्यांनी भेट दिली.

यावेळी त्यांच्यासोबत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने, महानगरपालिकेचे मुख्यालेखा अधिकारी डॉ. जनार्दन पक्काने यांच्यासह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.

आज सर्वप्रथम खर्च निरीक्षक ए. गोविंदराज व मयंक पांडे यांनी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची त्यांच्या कक्षामध्ये भेट घेतली. त्यानंतर अप्पर जिल्हाधिकारी कक्षामध्ये जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत स्थिरनिगरानी पथक तसेच भरारी पथकाच्या गेल्या काही दिवसातील कार्याचा आढावा घेतला. यावेळी विधानसभा निवडणुकीसाठी केवळ ४० लक्ष रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे उमेदवारांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्याचे स्पष्ट केले. जाहीर कार्यक्रम, सभा, याबाबत रॅलीचे संपूर्ण रेकॉर्ड्रींग झाले पाहिजे. व्हिडिओग्राफरने अतिशय व्यावसायिकपणे चित्रीकरण केले पाहिजे. तपासणी दरम्यान सगळ्या गाड्यांचे नंबर, साहित्याचा तपशील कॅमेऱ्यात कसा येईल याबाबत त्यांनी सूचना केल्या.

सिव्हिल कक्षाला त्यांनी भेट दिली कक्षाचे नोडल अधिकारी गंगाधर इरलोड यांनी त्यांचे स्वागत केले. आचारसंहितेपासून झालेल्या कामकाजाचा आढावा दिला.

त्यानंतर त्यांनी निवडणुकीच्या खर्चावर नियंत्रण ठेवणाऱ्या खर्च समितीच्या कार्यालयाला भेट दिली. निवडणूक खर्चा संदर्भात नोडल अधिकारी असणारे डॉ जनार्दन पक्काने यांनी यावेळी कक्षाच्या संदर्भात माहिती दिली. एमसीएमसी समितीच्या कक्षाला यावेळी त्यांनी भेट दिली. जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांनी त्यांचे स्वागत केले.

जाहिरातीवरील खर्च उमेदवाराचा मुख्य खर्च असून सर्व वर्तमानपत्रे, समाज माध्यम, बल्क एसएमएस संदेश तसेच सोशल माध्यमावरील पोस्ट या सर्व बाबींची माहिती खर्च निरीक्षकांना नियमितपणे कळली पाहिजे. यासाठी एमसीएमसी समितीने तत्पर रहावे. तसेच पेडन्यूजचा प्रकार होत तर नाही ना याकडे लक्ष वेधावे, असे यावेळी सांगितले.

### एकाच चित्रपटात सनी देओल आणि बॉबी देओल, बॉक्स ऑफिसवर घालणार धुमाकूळ!

**मुंबई/प्रतिनिधी** : यावेळी प्रत्येकाला बॉबी देओलसोबत काम करण्याची इच्छा आहे. 'निमल' नंतर त्याच्याकडे चित्रपटांची ओढ आहे. मोठमोठे दिग्दर्शक आणि मोठमोठे सिनेमे त्याच्या हातात आहेत. १००० कोटींच्या बजेटमध्ये बनत असलेल्या भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात महागड्या चित्रपटातही तो खलनायक बनणार आहे.अशा परिस्थितीत दिग्दर्शक अनिल शर्मा यांनीही त्याच्यासोबत काम करण्याबाबत बोलले आहे. अनिलने यापूर्वीही बॉबीसोबत काम केले आहे. त्याने त्याचा भाऊ सनी देओलसोबत अनेक चित्रपट केले आहेत. सनीसोबतचा 'गदर २' हा त्याचा शेवटचा चित्रपट होता.ललनटॉपला दिलेल्या मुलाखतीत अनिल शर्माने सांगितले की, त्याला बॉबीसोबत काम करायचे आहे. तो म्हणतो, मला बॉबी देओलसोबत काम करायचे आहे. त्याच्यासोबत मी नक्कीच चित्रपट करेन. यावर काम सुरू आहे. आता त्याने येथे स्पष्ट केले नाही की तो बॉबी देओलसाठी वेगळ्या चित्रपटाची योजना आखत आहे की तो त्याला त्याच्या एका चित्रपटात कास्ट करेल, ज्यामध्ये इतर कलाकार मुख्य भूमिकेत असतील.आम्ही हे सुद्धा म्हणत आहोत कारण याच मुलाखतीत अनिल शर्मा सुद्धा 'अपने २' बद्दल बोलले होते. सनी देओल आणि बॉबी देओल यांच्या 'अपने' चित्रपटाचा हा सिक्वेल आहे. त्यामुळे या चित्रपटात बॉबी देओल असणार असून, सनी देओल मुख्य भूमिकेत आहे. अनिल म्हणतो, अपने २ ची स्क्रिप्ट फायनल झाली आहे. आता पुढे काय होते ते पाहू.

### ठाण्यात भाजपच्या संजय केळकरांविरोधात चक्रव्यूह?; स्वपक्षीय नेता फुटला, शिंदे गट-मनसेतूनही तगडे उमेदवार रिंगणात

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात विधानसभा निवडणुकीचं बिगुल वाजलं आहे. राज्यातील सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. महायुतीमधून भाजप आणि शिवसेना शिंदे गटाने उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. भाजपकडून ठाणे शहर विधानसभेतून विद्यमान आमदार संजय केळकर यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र संजय केळकर यांना उमेदवारी जाहीर होताच शिंदे गटने नाराजी व्यक्त केली आहे. ठाणे विधानसभा मतदारसंघात कोणालाही उमेदवारी द्या, तो निवडणून येईल, पण संजय केळकर यांना देऊ नका, अशी प्रतिक्रिया शिंदे गटाकडून देण्यात आली. तर भाजपमध्ये देखील संजय केळकर यांच्याविरोधात बंडखोरी होणार असल्याचे संकेत दिसत आहे. संजय केळकर यांना तिकीट जाहीर झाले असताना भाजपचे ज्येष्ठ माजी नगरसेवक मिलिंद पाटणकर आज उमेदवारी अर्ज घेणार असल्याची माहिती समोर आली आहे. ठाणे शहर मतदार संघात अपक्ष निवडणूक लढवण्याचा मिलिंद पाटणकर यांचा निर्धार आहे. मिलिंद पाटणकर हे ५ टर्म नगरसेवक होते, तर उपमहापौरपद देखील काही काळ त्यांच्याकडे होते, असे असून पक्षाने दुर्लक्ष केल्याने आज मिलिंद पाटणकर उमेदवारी अर्ज घेणार असून ही निवडणूक अपक्ष लढवणार असल्याची माहीत समोर येत आहे.

# निवडणूक कर्तव्य बजावण्यास नकार देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर वेदांतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ




**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात सध्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या असून, सदरील निवडणुकांमध्ये छत्रपती संभाजीनगर मध्ये काही कर्मचाऱ्यांकडून कामावर येण्यास टाळाटाळ करण्यात येत होती त्यांना वारंवार लेखी आदेश तसेच कारण दाखवा नोटीस देऊन देखील हे कर्मचारी कामावर हजर न झाल्यामुळे नायब तहसीलदार यांच्या फिर्यादीवरून संबंधित कर्मचाऱ्यांच्या विरोधात वेदांत नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील काही कर्मचाऱ्यांनी निवडणुकीचे कामे करण्यास गैरहजर राहिल्या प्रकरणी त्यांच्या विरोधात आता थेट गुन्हाच दाखल करण्यात आला आहे, मुकुंद बाबुराव उन्हाळे नायब तहसीलदार यांच्या फिर्यादीनुसार अमोल सुभाष सोनवणे, अमोल सुभाष ताटे, मोगल मोईज बेग, योगेश प्रमोद कुलकर्णी, स्वप्निल कुलकर्णी, प्रदीप जाधव, मिर्झा अकबर बेग, शेख शौकत नवी, सर्व कनिष्ठ लिपिक तसेच सय्यद इरशाद, रियाज शेख, टी एस चव्हाण, ज्ञानेश्वर कड, व नंदा विनायक राठोड सर्व सहशिक्षक यांना वारंवार कारणे दाखवा नोटीस व लेखी आदेश देऊन देखील हे कर्मचारी कामावर परत न आल्यामुळे त्यांच्या विरोधात कलम १३४ लोकप्रतिनिधी अधिनियम याद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल डहाके करत आहेत अशी माहिती पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी दिली आहे.

# उद्धव ठाकरे सह शिवसेनेने विश्वासघात केला - संभाजी ब्रिगेड

दैनिक आपला विदर्भ



**पुणे /प्रतिनिधी** : संभाजी ब्रिगेड गेल्या ३५ वर्षापासून शिव-फुले-शाहू-आंबेडकर हि विचारधारा घेऊन कार्यरत आहे. संविधानाचे रक्षण, महाराष्ट्र हित व लोकहित याच्या रक्षणासाठी कटिबद्ध राहिली आहे. दोन वर्षापूर्वी शिवसेना (उबाटा) यांच्या बरोबर संभाजी ब्रिगेड ची युती झालेली होती. लोकसभा निवणुकीत एकही जागा न घेता संभाजी ब्रिगेडने शिवसेना (उबाठा) व मविआ चा प्रचार केला. महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले, त्यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधानसभेला संभाजी ब्रिगेडला त्यांच्या कोट्यातून किमान ४ ते ५ जागा देण्याचे आश्वासन दिले होते, परंतु विधानसभेच्या जागा वाटपात आम्हाला सन्मानपूर्वक स्थान व सन्मानपूर्वक जागा दिल्या नाहीत. त्यामुळे शिवसेना (उबाठा) बरोबरची युती तोडून महाविकास आघाडीतून आम्ही बाहेर पडत आहोत. जात, धर्म व फैसिस्ट शक्तींना ब्रिगेडचा नेहमीच विरोध राहिला असून तो कायम राहील. संविधान व लोकशाहीच्या रक्षणामाठी आम्ही लोकांचे प्रश्र्न व महामानवाचे विचार घेऊन निवडणुकीला गामोरे जात आहोत. सुमारे ५० जागेवर आमचे उमेदवार अर्ज भरणार आहेत. सामाजिक चळवळीतून आम्ही कार्यरत आहोत. विषमतेविरोधात आमचा संघर्ष कायम राहील. लोकहिताच्या पक्षाला प्राधान्य देऊन त्यासाठी प्रभोधनाची आमची भूमिका आहे. महाविकास आघाडी पुरोगामित्वाची भाषा बोलत असली तरीही सामाजिक चळवळी व पक्ष यांना योग्य सहभाग व वाटा देण्याची त्यांची मानसिकता दिसत नाही. महायुतीची सनातन विषमता व आघाडीचे नकली पुरोगामीत्व याविरोधात तयार करण्याची गरज आहे.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांच्या नेतृत्वाखाली आज शिवसेनेसोबतची युती तोडण्याचा निर्णय घेण्यात आला. संभाजी ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीच्या वतीने पुण्यात पत्रकार संघामध्ये आज पत्रकार परिषद घेण्यात आली.

यावेळी मुख्य प्रवक्ते शिवश्री गंगाधर बनबरे, प्रदेश प्रवक्ते संतोष शिंदे, शिवधी अभिमन्यू पवार, इंजि. मनोजकुमार गायकवार, उत्तर जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर गाडगे उत्तम कामठे, पुणे शहराध्यक्ष अविनाश मोहिते, ज्योतिबा नरवडे, अविनाश घोडके, सिद्धार्थ कोंढाळकर आदी उपस्थित होते.

# अखेर काँग्रेसच्या जयश्री शेळके यांच्या हातावर शिवबंधन

## बुलढाणा विधानसभा मतदार संघात मशाल हाती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनाकलनीय राजकीय घडामोडी घडताना दिसून येत आहेत. अशातच जिल्ह्यातील काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदाधिकारी जयश्रीताई शेळके यांनी मुंबई येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत प्रवेश करून शिवबंधन हातावर बांधून बुलढाणा विधानसभा मतदार संघाची उमेदवारीही मिळवली असल्याचे सूत्रांची माहिती त्यामुळे विरोधकांची मात्र पायाखालची वाळू सरकली आहे.

बुलढाणा विधानसभा मतदार संघासाठी जालिंदर बुधवत, रविकांत तुपकर व जयश्री शेळके यांच्या नावाची चर्चा होती. तर





यापैकी जयश्री शेळके ह्या या शर्यतीत अव्वलस्थानी होत्या. अखेर त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत प्रवेश करून बुलढाणा विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी ही मिळविली आहे. काँग्रेसच्या प्रदेश सचिव जयश्री शेळके यांनी शिवसेनेत प्रवेश करून शिवबंधन बांधले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीकरिता जयश्री शेळके यांची उमेदवारी निश्चित असल्याची खात्रीलायक माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. तर,जयश्री शेळके, रविकांत तुपकर, जालिंदर बुधवत आज दुपारी मातोश्रीवर उमेदवारीसाठी गेले असता यामध्ये रविकांत तुपकर यांची चर्चा दरम्यान तूर्तास बुधवत यांना थांबविण्यात आले असून जयश्री शेळके यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. दरम्यान बुलढाणा विधानसभा निवडणुकीत जयश्री शेळके ह्या उबाठा शिवसेनाकडून लढणार आहेत. त्यामुळे मात्र इतर उमेदवारांच्या पायाखालची वाळू सरकल्याचे चित्र विधानसभा मतदार संघात दिसून येत आहे.

## विविध वृत्त...

### डॉ. सिद्धार्थ देवळे यांना शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी जाहीर



दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी** : वाशिम मंगरुळपीर अनुसूचित जाती मतदार संघातून डॉ. सिद्धार्थ देवळे यांची उमेदवारी जाहीर झाली असून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून पहिल्याच यादीत वाशिम –मंगरुळपीर मतदार संघातून डॉ. सिद्धार्थ देवळे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. वाशिम मंगरुळपीर विधानसभा मतदार संघाचे उमेदवार तथा वाशिम शहरातील हृदयरोगतज्ञ डॉ. सिद्धार्थ देवळे यांनी दोन दिवसापूर्वी डॉ. सिद्धार्थ देवळे यांनी मातोश्रीवर संपर्क प्रमुख खा. अरविंद सावंत, जिल्हा प्रमुख सुरेश मापारी, सहसंपर्क प्रमुख सुधीर कव्हर, युवासेना जिल्हा प्रमुख नितीन मडके, कॅप्टन प्रशांत सुर्वे यांच्यासह शिवसेना पदाधिकार्यांच्या उपस्थितीत प्रवेश केला होता. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत डॉ. सिद्धार्थ देवळे यांनी वंचित कडून निवडणूक लढवत क्रमांक दोन ची मते घेतली होती. आता उबाठा शिवसेनेकडून त्यांना वाशिम मंगरुळपीर या विधानसभा मतदार संघाची उमेदवारी देत विरोधकांना तडीसतोड उमेदवार देत भाजपच्या हातून हा विधानसभा मतदार संघ घेण्याची तयारी चालविली आहे.

### नवापूरचे आमदार शिरीष नाईक यांनी पुन्हा निवडणूक लढण्याची इच्छा; येणाऱ्या काळात आदिवासी समाज काँग्रेसच्या बाजूने उभा राहणार - आ. शिरीष नाईक



दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी** : राज्यात विधानसभेच्या निवडणुका घोषित झाल्या असल्याने अनेक इच्छुक उमेदवार तयारीला लागले आहेत. नवापूर विधान सभेचे काँग्रेसचे आमदार शिरीष नाईक यांनी देखील काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी करण्यासाठी इच्छा व्यक्त केली असून, पक्षाने पुन्हा मला संधी द्यावी अशी इच्छा व्यक्त केली आहे तर निवडणुका या विकासाच्या मुद्द्यावर लढवल्या जाणार आहेत. गेल्या पाच वर्षात मी मतदारसंघाच्या मोठ्या प्रमाणावर विकास केला आहे. भाजप सरकार हे आदिवासी विरोधी आणि संविधान बदलणार असल्याच्या लोकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. देशाचे गृहमंत्री अमित शहा हे समान नागरी कायदा करण्याची भाषा करत आहे त्यामुळे आदिवासींमध्ये मोठा रोष निर्माण झाला असल्याने या लोकांच्या विरोधात काँग्रेस एकजुटीने उभी राहणार असून आदिवासींच्या हक्क आणि न्याय साठी कोणी लढणार असेल तर फक्त काँग्रेसच असे शिरीष नाईक यांनी सांगितले,

### निवडणुकाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दल सतर्क,कुठलाही अनुचित प्रकार घडु नये यासाठी आंतरराज्य तपासणी नाके



दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी** : राज्यात विधानसभेच्या निवडणुका लागल्या असल्याने पोलीस प्रशासन देखील सतर्क झालं असून, नंदुरबार जिल्हा हा गुजरात आणि मध्य प्रदेश राज्याच्या सीमेवरती असल्याने या सीमेवरती सीमा तपासणी नाका लावण्यात आले आहेत. जिल्ह्यात १६ ठिकाणी आंतरराज्य तपासणी नाके लावण्यात आले आहेत. कुठल्याही पद्धतीने अवैद्य दारू वाहतूक किंवा कुठल्याही वस्तू जिल्ह्यात येणार नाही यासाठी जिल्हा पोलीस दल सतर्क झाला असल्याच्या



पोलीस उप महासंचालक निरीक्षक दत्तात्रेय करळे यांनी, राज्यात आदर्श आचारसंहिता लागली आहे. त्यामुळे आचारसंहितेच्या कुठलाही भंग होणार नाही यासाठी पोलीस विभाग तात्पर्य आणि दक्षता घेत आहे कुठलाही अनिश्र्चित प्रकार घडवणे यासाठी पोलीस प्रशासन दक्षता घेणार आहेत त्यासोबत अनुचित प्रकार घडवणारे लोकांवर कडक कारवाई करणार असल्याचे संकेत देखील पोलीस उपमहानिरीक्षक यांनी दिले आहेत.

## नागरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मतदान जनजागृती रॅली

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप




**बिबी** : स्थानिक दुसरबीड दि. २३ ऑक्टोबर २०२४ रोज बुधवारला नारायणराव नागरे महाविद्यालय दुसरबीड येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मतदान जनजागृती निमित्त प्रभात फेरी काढण्यात आली.

नागरिकांनी उत्स्फूर्तपणे मतदानासाठी येऊन भयमुक्त मतदान करावे व जास्तीत जास्त संख्येने मतदान व्हावे यासाठी प्रभात फेरी काढण्यात आली होतीकार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नागरे ( अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती ) यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी प्राध्यापक रुंद यांनी संपूर्ण गावात प्रभात काढली तसेच नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले व मतदान का करावे हे सुद्धा सांगितले.

या कार्यक्रमांमध्ये प्रा. डॉ. दीपक देशमाने प्रा. मिलिंद गवई प्रा. देवानंद नागरे प्रा. सत्यम श्रीवास्तव प्रा. कु.नयना गवारे प्रा. शेख युनूस प्रा. जगदीश यादव प्रा. मेहेर प्रा. महेश कायंदे श्री अनिल गायकवाड श्री अनिल रणमळे मोठ्या संख्येने गावातील नागरिक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

## शेतकऱ्यांसाठी येणाऱ्या युरियाचा गैरवापर, बीड कृषी विभागाची धडक कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**बीड /प्रतिनिधी** : शेतकऱ्यांसाठी येणाऱ्या अनुदानित युरियाचा काळाबाजार करुन तो उद्योगासाठी वापरणाऱ्या रॅकेटचा बीडच्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी पर्दाफाश केला आहे. आष्टी तालुक्यातील घाटापिंप्री येथे टाकलेल्या धाडीत हा प्रकार समोर आला आहे. आता या प्रकरणातील लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासात मोठे रॅकेट उघडकीस येऊ शकणार आहे.

शेतकऱ्यांसाठी येणाऱ्या युरियाची अनेकदा टंचाई जाणवते. यामागे होणारा काळाबाजार कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी उघडकीस आणला आहे. बीड–अहमदनगर रोडवर घाटापिंप्री शिवारात आबासाहेब शेळके यांच्या गोठ्याशेजारी असलेल्या खोलीची पाहणी केली असता त्या ठिकाणी युरियाच्या पन्नास भरलेल्या व रिकाम्या ७४४ बॅग आढळून आल्या. यानंतर त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने तेथून जवळच असलेल्या खंडोबा वस्ती परिसरातील शरद घोडके यांच्या नव्याने बांधकाम झालेल्या इमारतीमध्ये असलेल्या साठ्याबाबत माहिती दिली. त्या ठिकाणी देखील पॅकींगचे साहित्य आढळून आले. या कारवाईत १ लाख ४० हजार ६८९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आबासाहेब शेळके याच्या विरोधात अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस करत आहेत.

प्लायवुड आणि पेंट इंडस्ट्रीसाठी वापर

शेतकऱ्यांसाठी येणारा युरिया हा अनुदानित असतो. शेतकऱ्यांना ही बॅग २६६ रुपयांना मिळते. याची मुळ किंमत २२५७ रुपये आहे. तर उद्योगाच्या वापरासाठी येणारा युरिया हा वेगळ्या पॅकींगमध्ये येतो, त्यावर कोणतेही अनुदान नसते. किंमतीत असलेल्या मोठ्या फरकामुळे याचा काळाबाजार करुन शेतकऱ्यांसाठी येणारा युरिया उद्योगासाठी पुरवण्याचा हा धंदा सुरु होता. हा युरिया प्लायवुड व पेंट इंडस्ट्रीसाठी पाठवला जात होता. आता

हा प्रकार उघडकीस आल्याने सदर आरोपीने तो कोठून खरेदी केला आणि कोठे पाठवला, याबाबतची माहिती समोर येऊ शकणार आहे.

## मुस्लीम व्यक्ती करू शकतात एकापेक्षा जास्त विवाहांची नोंदणी, काय म्हणाले मुंबई उच्च न्यायालय?

**मुंबई/प्रतिनिधी** : मुस्लिम विवाहाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. एक मुस्लिम व्यक्ती पर्सनल लॉ अंतर्गत महापालिकेत एकापेक्षा जास्त विवाहांची नोंदणी करू शकते, असे न्यायालयाने आपल्या ऐतिहासिक निर्णयात म्हटले आहे. न्यायमूर्ती बी.पी. कुलाबावाला आणि सोमशेखर सुंदरसन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, मुस्लिम पर्सनल लॉ एकापेक्षा जास्त विवाहांना परवानगी देतो. अल्जेरियन महिलेसोबत मुस्लिम पुरुषाच्या तिसऱ्या लग्नासाठी आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्याचे आदेश खंडपीठाने ठाणे महापालिकेच्या विवाह नोंदणी कार्यालयाला दिले आहेत. मुस्लिम व्यक्तीने फेब्रुवारी २०२३ मध्ये अर्ज दाखल केला होता.

मुस्लीम तरुणाने न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत सांगितले होते की, त्याने अल्जेरियातील एका महिलेशी तिसरे लग्न केले आहे. आपल्या तिसऱ्या पत्नीसोबत लग्नाची नोंदणी करण्यासाठी त्याने ठाणे महापालिकेकडे अर्ज केला होता. महाराष्ट्र मॅरेज ब्युरो रेग्युलेशन आणि मॅरेज रजिस्ट्रेशन ॲक्टचा हवाला देत अधिकाऱ्यांनी लग्नाची नोंदणी करण्यास नकार दिल्याचा दावा या जोडप्याने कोर्टात दाखल केलेल्या याचिकेत केला आहे. त्यांचा युक्तिवाद असा होता की राज्य कायद्यांतर्गत 'विवाहाची व्याख्या' फक्त एकाच विवाहाची नोंदणी करण्यास परवानगी देते.

न्यायालयाने म्हटले आहे की, मुस्लिम पर्सनल लॉनुसार मुस्लिम पुरुषाला एकाच वेळी चार बायका ठेवता येतात. न्यायमूर्ती बी.पी. कुलाबावाला आणि सोमशेखर सुंदरसन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, मुस्लिम व्यक्तीला तिसरा विवाह नोंदवण्यापासून रोखणाऱ्या विवाह नोंदणी कायद्यात काहीही आढळले नाही. सुनावणीच्या १० दिवसांच्या आत विवाह नोंदणी मंजूर किंवा नाकारण्याचा तर्कसंगत आदेश द्यावा, असा आदेश न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाने याचिकाकर्त्याला दोन आठवड्यांत ठाणे महापालिकेत सर्व कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणी आदेश देताना न्यायालयाने म्हटले आहे की, याचिकाकर्त्याच्या दुसऱ्या लग्नाची नोंदणी करणारे अधिकारी आता महाराष्ट्र मॅरेज ब्युरो रेग्युलेशन अँड मॅरेज रजिस्ट्रेशन कायद्यांतर्गत झालेल्या लग्नाचा दाखला देत तिसऱ्या लग्नाची नोंदणी करत आहेत, ही विचित्र विडंबना आहे. अधिका–यांचा युक्तिवाद ग्राह्य धरल्यास महाराष्ट्र मॅरेज ब्युरो रेग्युलेशन अँड मॅरेज रजिस्ट्रेशन ॲक्टने मुस्लिम पर्सनल लॉची जागा घेतली आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

## पुन्हा एकदा चिखली विधानसभा मतदारसंघात

# महायुतीला विजय मिळवून देणार आमदार श्वेता महाले यांचा निर्धार

### २८ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : चिखली मतदरासंघातील जनतेच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा चिखली विधानसभा मतदारसंघात महायुतीला विजय मिळवून देणार आहे. असा निर्धार भाजपच्या आ. श्वेता महाले यांनी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना केला. चिखली विधानसभा मतदार संघासाठी महायुतीकडून आ. श्वेता महाले यांना पुन्हा उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. उमदेवारी जाहीर झाल्यानंतर आ. श्वेता महाले यांनी प्रतिक्रिया देताना मतदार संघात पुन्हा विजय मिळवून देणार असल्याचा निर्धार केला आहे. तर भाजपचे राजकारण हे कायम विकासाच्या भोवती फिरलेले आहे. गेल्या अडीच वर्षांत महायुतीचे सरकार आल्यानंतर केलेली कामे घेऊनच मतदारांसमोर जाणार आहे. ज्या लोककल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोहचल्या आहेत. त्यामुळे जनतेचा कौल हा महायुतीच्या बाजुने आहे. या लोककल्याणकारी योजना व विकास कामांच्या जोरावर मतदारांसमोर जाणार असून दि. २८ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती चिखली विधानसभा मतदार संघाच्या भाजपच्या आमदार श्वेता महाले यांनी दिली.